सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-68597431, 68597470
ई-मेल–desk11@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : ११/तंशिसं/फर्निचर/ निर्लेखन/२०२३-२४/ ७३२
दिनांक : - 1 NOV 2023

## निर्लेखित साहित्याची विक्री सुचना

या कार्यालयातील जुन्या निर्लेखित फर्निचर (खुर्च्या) विकण्यासाठी अनुभवी व इच्छुक खरेदीदारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. या संदर्भातील अधिक माहिती या कार्यालयाच्या सूचना फलकावर व या कार्यालयातील कार्यासन क्र. ११ येथे कार्यालयीन वेळेत मिळू शकेल. सदरचे साहित्य इच्छुक खरेदीदारांना दि.०१/११/२०२३ ते दि.०८/११/२०२३ रोजी दुपारी ०२.०० ते ३.०० या वेळेत दाखविण्यात येईल. सदर साहित्याची पाहणी करुन त्याबाबतचे दरपत्रक त्यांनी दि.०८/११/२०२३ रोजी दुपारी ३.३० वाजेपर्यंत सीलबंद लखोट्यात सादर करावे . त्याच दिवशी दुपारी ०४.०० वाजता सदर फर्निचर (खुर्च्या ) ची दरपत्रके उघडण्यात येतील.

### कार्यालयातील निर्लेखित केलेल्या फर्निचर (खुर्च्या) ची विक्री प्रक्रियेतील नियम अटी व शर्ती

१. कार्यालयातील कालबाह्य, निरुपयोगी, निर्लेखित फर्निचरची " **जिथे आहे जसे आहे** " स्थितीत विक्री करणे आहे.

२. विक्री करावयाच्या वस्तु कार्यालयात संस्थेत दि.०१/११/२०२३ ते दि.०८/११/२०२३ या दरम्यान दुपारी ०२.०० ते ३.०० वाजेपर्यंत पहावयास मिळतील .

३. **दरपत्रक प्रपत्र-अ मध्ये भरुन सीलबंद द्यावयाचे आहे. सोबत अनामत रक्कम म्हणून रु. १०००/- चा डिमांड ड्राफ्ट** "Director, Technical Education , M.S., Mumbai" **या नावे काढून दरपत्रकासोबत सीलबंद पाकीटात द्यावा. अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट सीलबंद पाकीटात जमा न केल्यास ते दरपत्रक रद्द समजण्यात येईल.**

४. पूर्ण भरलेले सीलबंद कोटेशन स्विकारण्याची अंतिम मुदत दि.०८/११/२०२३ रोजी दुपारी ३.३० वाजेपर्यंत राहील. सदर तारखेनंतर आलेल्या कोटेशनचा विचार केला जाणार नाही. कोणत्याही प्रकारचा टपालाचा विलंब ग्राह्य धरला जाणार नाही.

५. सीलबंद दरपत्रकाच्या पाकिटावर " **विक्री प्रक्रियेचे दरपत्रक - खुर्च्या** " असा उल्लेख करावा.

६. दरपत्रकातील दर प्रत्यक्ष फर्निचर - खुर्च्या जागेवर पाहूनच देणेत यावेत.

७. सोबत दिलेल्या प्रपत्र-अ मध्ये वस्तुंची शासकीय नियमानुसार निर्लेखित किंमत दिली आहे.

८. दरपत्रके उघडण्याच्या वेळी केवळ निविदा भरलेल्यांनाच उपस्थित राहता येईल. त्या करिता विक्री धारकाचे केवळ एकच प्रतिनिधी उपस्थित राहतील व उपस्थित राहणा-यांस त्यांचा ओळखीचा पुरावा दाखवावा लागेल.

९. ज्यांचे दरपत्रक मंजूर झाले असेल, त्यांनी सदर माल स्वत: आहे त्या स्थितीत व असेल त्या ठिकाणावरुन आदेश मिळाल्यापासून तीन दिवसांच्या आत स्वखर्चाने घेऊन जाणे. साहित्य नेण्यापूर्वी साहित्याची संपूर्ण रक्कम डिमांड ड्राफ्ट द्वारे भरणे आवश्यक आहे. **साहित्य खरेदीची रक्कम रोखीने/चेक द्वारे स्विकारली जाणार नाही.** जर त्यांनी पूर्ण रक्कम भरली नसेल व सदरचा माल विहित मुदतीत घेऊन गेले नाहीत, तर कार्यालय जबाबदार राहणार नाही व डिपॉझिट रक्कम शासन जमा केली जाईल. नंतर त्या लॉटवर त्यांचा हक्क राहणार नाही.

१०. दरपत्रक मंजूर झाल्यास रक्कम भरुन सामान नेताना गेट पास घ्यावा व गेट पासवर संबंधितांची सही घ्यावी.

११. साहित्य उचलताना त्यावर कोणत्याही प्रकारचा टॅक्स वगैरे लागत असेल तर तो खरेदीदाराने स्वत: भरावा.

१२. दरपत्रक मंजूर झाल्यानंतर सर्व साहित्य सांभाळण्याची जबाबदारी खरेदीदाराची राहील.

१३. तांत्रिक कारणास्तव वस्तू विकण्याचा अथवा न विकण्याचा अंतिम निर्णय हा या कार्यालयाचा राहील .

१४. कोणतेही कारण न देता दरपत्रक मंजुर अथवा नामंजूर करणेचा किंवा संपुर्ण खरेदी प्रक्रिया रदद करण्याचा हक्क निम्नस्वाक्षरीकार यांनी राखुन ठेवलेला आहे. तसेच अटी व शर्तीचा भंग केल्यास मंजुर ठेका रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आलेला आहे.

१५. विक्रीच्या तारखेत बदल झाल्यास त्याबाबत संकेतस्थळावर सुचना प्रसिद्ध करण्यात येईल.

१६. एका बंद लिफाफ्यामध्ये पॅन कार्ड झेरॉक्स, व्यवसाय रजिस्ट्रेशन झेरॉक्स, GST रजिस्ट्रेशन झेरॉक्स, व रु.१०००/- चा डिमांड ड्राफ्ट व दुस-या लिफाफ्यात प्रपत्र —अ भरुन दोन्ही लिफाफे सीलबंद एकत्रीत करुन ते कार्यालयातील टेंडर बॉक्स मध्ये टाकावेत.

१७. इच्छुक खरेदीदारांनी केवळ या कार्यालयाकडून दिल्या जाणा-या को-या प्रपत्र —अ मध्ये आपले दर भरुन सादर करावेत.

दरपत्रक सादर करावयाचा कालावधी : दि.०१/११/२०२३ ते दि.०८/११/२०२३
सकाळी ११.३० ते ३.३० वाजेपर्यंत राहील
दरपत्रक दि.०८ /११/२०२३ रोजी दुपारी ४.०० वाजता उघडण्यात येतील.

( डॉ.विनोद म. मोहितकर )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय म.रा., मुंबई

महाराष्ट्र शासन

तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-68597431, 68597470

ई-मेल–desk11@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

# प्रपत्र - अ
# लिलाव — दरपत्रक

मी स्वत: विक्रि करण्यात येणा-या सर्व साहित्याची/वस्तूची प्रत्यक्ष पाहणी सेली आहे. मला सदर वसतुची शासकीय किंमत माहित आहे.या सर्व प्रक्रिये करीता लागू सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत करीता खालीलप्रमाणे दरपत्रक भरत आहे.

(सदर दरपत्रकासाठी आपली निवड झाल्यास लवकरात लवकर कार्यालयात डिमांड ड्राफ्ट द्वारे रक्कम भरावी व वस्तू /साहित्य घेऊन जावे)

| तपशिल | शासकीय किंमत | खरेदीदाराची किंमत (शासकीय किंमतीपेक्षा जास्त नमूद करावी) |
|---|---|---|
| कार्यालयातील निर्लेखित फर्निचर (खुर्च्या) | रु. १,४६७/- (अक्षरी रु.एक हजार चारशे सदुसष्ट फक्त) | |

सही :

नांव :

एजन्सीचे नांव :

दिनांक :